# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**रूपये:- ४,२२,१२,८७,०००/-**<br>**श्री. आदित्य ठाकरे** |
| (१) | १५१८ | १० | ना. म. जोशी, वरळी, नायगाव व शिवडी येथील बी.डी.डी. चाळींची छते सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून पावसाळयाच्या काळात मोठ्या प्रमाणात गळतीची समस्या निर्माण होणे,. या गळतीमुळे चाळींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागणे, तसेच त्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होणे,सदर परिस्थितीचा विचार करता, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच गळती रोखण्यासाठी छतांवर शालीमार लावण्याचे काम तातडीने हाती घेण्याची आवश्यकता, याकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १५१९ | १० | वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प सध्या सुरू आहे. तथापि, पुढील टप्प्यात पुनर्विकासासाठी प्रस्तावित असलेल्या काही चाळी सध्या अतिशय जीर्ण अवस्थेत असणे, या चाळींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ दुरुस्ती करणे अत्यावश्यक असणे,सद्यस्थितीत उपलब्ध निधी प्रामुख्याने जुन्या देयकांच्या भरण्यासाठी खर्च होत असल्यामुळे चाळींच्या आवश्यक डागडुजी व दुरुस्तीच्या कामांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध होत नसणे,. त्यामुळे रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असणे,नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून वरळी बीडीडी चाळींच्या डागडुजी व तात्काळ दुरुस्तीच्या कामांसाठी आवश्यक निधी तात्काळ मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | १५२१ | १० | रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुका हा जिल्ह्याचे मुख्यालय म्हणून ओळखला जातो. जिल्हा प्रशासनाच्या दृष्टीने अलिबागचे महत्त्व मोठे असून येथे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मात्र सध्या या निवासस्थानांच्या इमारती अतिशय जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून त्यामध्ये राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही इमारतींची स्थिती इतकी खराब झाली आहे की त्या ठिकाणी राहणे सुरक्षित |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | राहिलेले नाही. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या जीर्ण इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन, सुरक्षित व सुसज्ज निवासस्थानांची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अलिबाग तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या जीर्ण झालेल्या निवासस्थानांच्या इमारती पाडून त्या ठिकाणी नव्याने इमारती बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १५२२ | १० | सांगोला तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासनाकडून पोलीस निवास वसाहत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मात्र या वसाहतीमधील घरे व इमारती सध्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहेत. त्यामुळे अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी या वसाहतीमध्ये वास्तव्यास राहू शकत नसून त्यांना इतर ठिकाणी राहण्याची व्यवस्था करावी लागत आहे. यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून त्यांच्या दैनंदिन कामकाजावरही त्याचा परिणाम होत आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित व सुसज्ज निवास व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. सांगोला तालुक्यातील पोलीस निवास वसाहतीमधील जीर्ण झालेली घरे व इमारती पाडून त्या ठिकाणी नव्याने निवासस्थाने बांधण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ६२,१९,५२,५७,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (५) | १५२५ | १० | श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघातील सर्व राज्यमार्ग,प्रधान जिल्हा मार्ग,ग्रामीण मार्ग यांची अतिशय दुरावस्था झालेली असणे, खराब रस्त्यांमुळे श्रीरामपूर व राहुरी तालुक्यातील आबालवृद्ध नागरिक, विद्यार्थी, गर्भवती महिला, रुग्ण यांना प्रवास करताना रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अतिशय त्रास होत असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अवजड वाहतूक आणि नागरिकांची दुचाकी, चारचाकी वाहने यांना वाहन चालवताना खूप कसरत करावी लागणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे वारंवार अपघात होत असणे, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजय चौधरी** |
| (६) | ११३९ | १०० | मौजे तळवडी, भंडकंबावाडी, ता.गुहागर, जि.रत्नागिरी येथील चिपळूण व गुहागर रस्त्यावरील भंडकंबा शाळेपा ासून सखाराम कांबळे यांच्या घरापर्यंतत रस्ता तयार करण्याबाबत तसेच चरवली करुळ फाटा ते परचुरी व तळवली फाटा व वडद गाव हा रस्ता तयार करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १३९३ | १०० | कुडाळ तालुक्यातील ( जि.सिंधुदुर्ग ) आंब्रड रतांबेवाडी मुख्य रस्ता ते केमदवाडी अनवणे वाडी ते पोखरण सिमा-ओहोळ पर्यतचा रस्ता सुमारे २० ते २५ वर्षापूर्वी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | केलेला असून त्यापासून आजपावेतो या रस्त्यांची डागडुजी केलेली नसणे, तसेच सदरच्या ओळोळवरील ब्रिज-मोरीची खूपच वाईट अवस्था असून पावसाळयात ग्रामस्थांचे खूप हाल होणे, या रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरिता वारंवार प्रशासनाकडे सरपंच व ग्रामस्थांनी करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (८) | १४९० | १० | माणगाव ते झाराप तिठा हा महत्वाचा मार्ग असून तो राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ला जोडतो. सदर रस्त्याची सध्या दुरावस्था झाली असून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असतानाही रस्ता अरुंद असल्यामुळे रहदारीस अडथळे निर्माण होत आहेत. रस्त्याच्या कामासाठी मंजूर निधी अपुरा असल्यामुळे दुपदरीकरणाचे काम प्रलंबित आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे दुपदरीकरण करण्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.तसेच झाराप तिठा परिसरात हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ ला जोडतो तिथे अंडरपास नसल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत..तरी या ठिकाणी अंडरपास अथवा उड्डाणापूल उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १४९१ | १० | माणगाव ते कालेली तालुका कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग या दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्याची सध्या अतिशय दुरावस्था झाली असून त्यामुळे दोन्ही गावांतील नागरिकांना रहदारीस मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. सदर रस्ता नव्याने करण्याची आवश्यकता असूनही आवश्यक निधी उपलब्ध नसल्यामुळे काम प्रलंबित आहे. त्यामुळे सदर रस्ता तातडीने नव्याने तयार करण्यासाठी आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१०) | १५३० | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर तालुका, कुही तालुका आणि उमरेड तालुका मध्ये रस्ते आणि पूलांची अवस्था अत्यंत बिकट आहे. पावसाळ्याच्या काळात वाहतूक अडचणीत येते, नागरिक, विद्यार्थी व रुग्ण वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी त्रास सहन करतात. सदर परिस्थिती लक्षात घेता, शासनाने मार्ग व पूल बजेटातील ३०५४ हेड अंतर्गत या तालुक्यांमध्ये रस्ते व पूल विकासकामांसाठी निधी तातडीने मंजूर करावा, ही नम्र विनंती करीत आहे. वरील कारणास्तव, मी या बाबतीत अर्थसंकल्पाच्या चर्चेत कपात सूचना मांडत आहे, आणि शासनाकडे आग्रह करतो की उमरेड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना मूलभूत रस्ते व पूल सुविधा लवकरात लवकर उपलब्ध होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १५३२ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील कुही तालुका, भिवापूर तालुका आणि उमरेड तालुका मध्ये रस्ते आणि पूल बांधकामाची परिस्थिती अनेक दिवसापासून बिकट आहे. पावसाळ्यात वाहतूक विस्कळीत होते, नागरिक, विद्यार्थी व रुग्ण वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी त्रास सहन करतात.सदर समस्यांकडे शासनाने अद्याप एक रुपयाचा निधीही मंजूर केला नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.सदर परिस्थिती लक्षात घेता, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाने मार्ग व पूल योजनेतून ३०५४ हेड अंतर्गत उमरेड विधानसभा मतदारसंघातील कुही, भिवापूर आणि उमरेड तालुक्यांमध्ये निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१२) | १३५७ | १० | मौ.पानगाव (ता. रेणापूर, जि.लातूर) ते रेणापूर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरु करण्यात आले, मात्र सध्या डांबरीकरणाचे काम बंद असणे, त्यामुळे डांबरीकरणाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, परिणामी ऊस वाहतुकीस व इतर वाहतुक ठप्प पडली असणे, मौ.पानगाव ग्रामस्थांनी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी वारंवार केली असणे, ग्रामस्थांनी आंदोलन व उपोषण केले असणे, परंतु अद्याप रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले नसणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक ग्रामस्थांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १३५८ | १० | मौ.नागठाणा (ता.अहमदपूर, जि.लातूर) श्री. सत्यविजय जाधव-शेती ते प्रजिमा-२१ असा रस्ता असणे, सदरच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची अवश्यकता असणे, शासनाने अद्याप प्रशासकीय मंजूरी दिली नसणे, मंजुरी अभावी रस्त्याचे काम सुरु झाले नसणे, रस्त्याअभावी दळणवळण व ऊस वाहतुक होत नसणे, त्यामुळे शेतकरी वर्गात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | १३६० | १० | सिरसम (पा.) (ता.पालम,जि.परभणी) ते सिरसम पाटो व सिरसम (पा) ते राणि सावरगाव या रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असणे, सदरचा रस्ता वाहतुकीस अयोग्य झाला असणे, रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असून रस्त्यावर दगडसुध्दा असणे, वाहतुक करणे अवघड झाले असणे, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेली तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | १३६३ | १० | सांगवी ते बरगडी (ता.पालम, जि.परभणी) व बरबडी ते पालम हा रस्ता अत्यंत खराब झाला असणे, रस्त्यात खड्डे पडले असणे, मोऱ्या व छोटया पुलांचे काम करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रस्त्याचे डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने दुर्लक्ष केले असणे, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | १४७६ | १० | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ग्रामपंचायत दिगवळे हद्दीतील करंबळीवाडी नाटे येथून श्री. उल्हास दत्तात्रय कुलकर्णी यांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून सध्या कच्चा असणे, पावसाळ्यात चिखल व पाणी साचल्यामुळे ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत असणे, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०२५-२६ च्या योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत सादर करण्यात आलेला असून तो मान्यतेसाठी प्रलंबित असणे, या रस्त्याच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १९,६४,६९,५३,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१७) | १५२८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील कुही तालुका, कुही तालुका, उमरेड तालुका आणि भिवापूर तालुका मध्ये शासकीय निवासस्थाने आणि रेस्ट हाऊसचे देखभाल व दुरुस्तीचे कामे प्रलंबित आहेत. अनेक ठिकाणी इमारती खराब अवस्थेत आहेत, ज्यामुळे सरकारी कामकाज व कर्मचारी व नागरिकांच्या सुविधांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता, शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २०५९ हेड अंतर्गत या तालुक्यांमध्ये शासकीय निवासस्थाने व रेस्ट हाऊस दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- २,३०,००,०००/-**<br>**श्री. मनोज जामसुतकर** |
| (१८) | १५२९ | १०० | मुंबईतील भायखळा मतदार संघातील सर जे.जे. समूह रुग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम सन २०२३-२०२४मध्ये लेखाशीर्ष ४२१०, ००४१, ५३ -मोठी कामे अंतर्गत मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यानुषंगाने ऑक्टोबर, २०२४ मध्ये दुरुस्तीच्या कामाच्या वर्कऑडर काढण्यात आलेली आहे. परंतु निधी अभावी अद्यापी दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम पूर्ण झालेली नाहीत. कांही कामे पूर्ण झालेले असून अनेक कामे निधी अभावी रखडलेली असून शासनाकडून संबंधित ठेकेदार कंपनीला टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्यामुळे कामे वेळेत पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे शासनाने सर जे.जे.समूह रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाच्या रखडलेल्या कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ७६,३०,०९,१२,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१९) | १४६२ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील रामा १३५ ते केशवनगर–मांजरी खुर्द–कोलवडी–उरुळी कांचन (कि.मी. ४/५०० ते ६/८००) हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. सदर रस्ता पुणे शहराला सोलापूर महामार्गाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा असून सध्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. सदर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रस्त्याच्या रुंदीकरण व सुधारणेसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असून या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सदर रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून काम तातडीने हाती घेणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२०) | १५२४ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर तालुका, कुही तालुका आणि उमरेड तालुका मध्ये रस्ते आणि पूल यांचा दर्जा अत्यंत खराब आहे. पावसाळ्यात वाहतूक अडचणीत येते, नागरिक, विद्यार्थी व रुग्ण वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी त्रास सहन करतात.सदर परिस्थिती लक्षात घेता, शासनाने ५०५४ हेड – भांडवली खर्चातून या तालुक्यांमध्ये रस्ते व पूल विकासकामांसाठी निधी तातडीने मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई